शैक्षणिक वर्ष २००८-०९
नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा /
तुकडयांना मंजूरी

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
आदेश क्रमांक एनजीसी २००८/(२१५/०८)/मशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ जुन, २००८

पहा:-१) शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००८ / (१८/०८) / मशि-३, दि.३०.०१.२००८ (Task Force)
२) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. एनजीसी / ०८-०९ /नवि महा अतु / मान्यता / मवि २-३, दि. ९.०५.२००८

## आदेश

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(४) नुसार राज्यातील विद्यापीठांनी शासनाकडे नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचे असतात, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी राज्यातील विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००८ / (१८/०८) / मशि-३, दि.३०.०१.२००८ अन्वये स्थापित कृतिसमितीद्वारे छाननी करण्यात आली. समितीचे अभिप्राय / शिफारशी व विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडयांना सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्यानुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

(१) ज्या महाविद्यालयांना नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडया मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांने त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

(२) संबंधित विभागीय सहसंचालकांचे हमीपत्र सादर केल्याविषयीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

(३) महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

(४) विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग महाविद्यालयाने नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात.

(५) शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून सदरची मान्यता देण्यात येत आहे. यावर्षी नवीन विषय, / विद्याशाखा / तुकडी सुरु न करणा-या महाविद्यालयांची नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांची ही मान्यता आपोआप रद्द झाली असे समजण्यात येईल.

(६) * अशी खुण असलेल्या महाविद्यालयातील नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना नकारात्मक शिफारस असली तरी सदरच्या नवीन विषय / अभ्यासक्रम / विद्याशाखा / तुकडयांना स्थानिक विद्यार्थ्यांसाठी आवश्यकता विचारात घेऊन मान्यता देण्यात येत आहे.

२. विद्यापीठाचे संलग्निकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विद्यापीठांनी करण्यापूर्वी शासनाच्या मान्यतेबाबतचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन केल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना पाठवावा.

३. हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 20080318153802001 आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्रकाश सुरवसे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहसंचालक,
४) संबंधित संस्था शासनाच्या संकेतस्थळावरुन
५) निवड नस्ती (मशि-३)

C:\Documents and Settings\ard\My Documents\revised CE 3\GR all region-stream-sub-div.doc

## मुंबई विद्यापीठ ( पदव्युत्तर विभाग )

**कला शाखा**

| अक्र | महाविद्यालयाचे नाव | नवीन विषय |
|---|---|---|
| | **मुंबई जिल्हा** | |
| १ | एस. के. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, विद्यानगर,विद्याविहार,मुंबई - ४०० ०७७. | एम. ए. (इकॉनॉमीक्स) |
| २. | के. जे. सोमय्या भारतीय संस्कृती पिठम ३ रा मजला, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अॅन्ड रिसर्च विद्याविहार, मुंबई - ४०० ०७७. | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्टडी ऑफ रिलिजन |
| | **ठाणे जिल्हा** | |
| ३. | के.व्ही. पेंढारकर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, डोंबिवली (पूर्व). जि. ठाणे. ४२१ २०३ . | एम. ए. (मराठी) |
| ४. | शंकर नारायण कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, महाविद्यालय मार्ग, नवघर, भांईदर (पुर्व), जि. ठाणे ४०१ १०५ | एम. ए. (इकॉनॉमीक्स) |
| ५. | श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर. जि. ठाणे - ४२१ ००३. | एम. ए. (इकॉनॉमीक्स) |
| ६. | श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर. जि. ठाणे - ४२१ ००३. | एम. ए. (मराठी) |
| ७. | श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर. जि. ठाणे - ४२१ ००३. | एम. ए. (इंग्लिश) |
| ८ | श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर. जि. ठाणे - ४२१ ००३. | एम. ए. (जिऑग्राफी) |
| ९. | श्रीमती चांदीबाई हिमतमल मनसुखानी कॉलेज, उल्हासनगर. | एम. ए. (हिंदी) |
| १० | शाहू शिक्षण संस्थाज अध्यापक महाविद्यालय कल्याण . | एम. एड्.(शिक्षण शास्त्र) |
| | **नवी मुंबई जिल्हा** | |
| ११ | शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये आर्टस, कॉमर्स अॅन्ड कॉम्प्युटर सायन्स कॉलेज, कळंबोळी ,नवी मुंबई - ४१० २१८. | एम.ए. (हिस्ट्री) |
| १२ | रयत शिक्षण संस्था, वीर वजेकर आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स कॉलेज , ता. उरण जिल्हा : रायगड | एम. ए.(रुरल डेव्हलपमेंट) |